सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०

# मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२

( दिनांक १९ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित )

***BOMBAY ACT NO. XXX OF 1942***

# The Bombay Cotton Control Act, 1942

*( As modified upto the 19th September, 2011 )*

✷

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१३

[ किंमत : रु. ५.०० ]

# मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२

## अनुक्रमणिका


**उद्देशिका**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

२. व्याख्या.

३. कोणत्याही क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करता येईल ती कापसाची जात ठरविणे, वगैरे याबाबत अधिकार.

३ अ. प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास किंवा कोणत्याही प्रतिषिद्ध जातीच्या कापसाची प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास कारखान्यांना परवानगी देणे.

४. शास्ती.

५. जप्त करणे.

६. जप्तीच्या वेळी अनुसरावयाची कार्यरीति

७. तडजोड करणे.

८. प्रवेश करण्याचा व धरण्याचा अधिकार.

९. अधिकृत व्यक्तीने तपासणी करण्यासाठी सवलती देण्याबाबत मालकाचे, भोगवटा करणा-याचे व जमीन वगैरे स्वाधीन असणा-या व्यक्तीचे कर्तव्य.

१०. खटला दाखल करण्यासाठी पूर्वमंजुरी व मुदत.

११. अपराधांची दखल घेणे.

११ अ. वाढविलेल्या शास्ती देण्याचा फौजदारी न्यायाधीशांचा अधिकार.

१२. या अधिनियमान्वये केलेल्या कृत्यांचे संरक्षण.

१३. या अधिनियमान्वये काम करणारा अधिकारी लोकसेवक असणे.

१४. नियम.

१५. रद्द करणे.

१६. सन १९५४ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक १७ हा रद्द करणे आणि बचाव.

***[ सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३० ][१]**

# [ मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२ ]†

**[ २ मार्च, १९४३. ]**

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९४७ चा मुंबई अधिनियम ६३.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७.

**[२][महाराष्ट्र राज्याच्या] कोणत्याही भागात कोणत्याही जातीच्या कापसाची लागवड करणे, प्रतिषिद्ध जातीच्या कापसाची इतर जातीच्या कापसाबरोबर भेसळ करणे आणि प्रतिषिद्ध जातीचा कापूस जवळ बाळगणे, वापरणे किंवा त्याचा व्यापार करणे, या गोष्टींचे नियमन करण्यासाठी व त्यास प्रतिषेध करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [३][महाराष्ट्र राज्यातील] काही क्षेत्रात, कापसाची लागवड करण्या-यांच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीने तसेच कापसाचा व्यापार व [४][उक्त राज्याची ]आर्थिक समृद्धी यांच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीने त्या क्षेत्रांत लागवड केलेल्या कापसाची प्रत व लौकिक कायम राखणे आणि त्या कारणासाठी अशा क्षेत्रात लागवड करावयाच्या कापसाची जात ठरविणे, इतर कोणत्याही जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करणे, प्रतिषिद्ध जातीच्या कापसाची इतर कोणत्याही कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे आणि प्रतिषिद्ध जातीचा कापूस जवळ बाळगणे, वापरणे किंवा त्याचा व्यापार करणे या गोष्टीस प्रतिषेध करणे किंवा त्यांवर निर्बंध ठेवणे इष्ट आहे ;

[५][ **त्याअर्थी ;** याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— ]

संक्षिप्त नाव व व्याप्ती.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२, असे म्हणावे.

[६][ (२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल. ]

व्याख्या.

**२.** विषयांत किंवा संदर्भात एतद्‌विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात—

(अ) " नियंत्रित क्षेत्र " याचा अर्थ, कलम ३ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेले क्षेत्र, असा आहे.

(ब) " कापूस " या संज्ञेत, कापसाचे रोप, [७][सरकी काढलेला कापूस, टरफलयुक्त कापूस (कपास)] गाळ कापूस (वेस्ट कॉटन ) व सरकी यांचा समावेश होतो ;

[(क) " कृषि संचालक " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्याचा कृषि संचालक म्हणून राज्य सरकारने त्या त्यावेळी नेमलेला अधिकारी असा आहे व तीत, या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार कृषि संचालकास जे

---

* सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २ अन्वये हा अधिनियम नव्याने अधिनियमित करण्यात आला.

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९४३, भाग ४, पृ. ७२ आणि ७३ पहा.

† हा अधिनियम राज्याच्या उर्वरित भागात लागू करण्यात आला (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम २ पहा.)

[२] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ अन्वये " मुंबई प्रांताच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ (१) (अ) अन्वये " मुंबई प्रांतातील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात यावा.

[४] वरील अधिनियमांच्या कलम ४ (१) (ब) अन्वये " उक्त प्रांताची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमांच्या कलम ४ (२) अन्वये परिच्छेद दोन आणि तीन ऐवजी हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमांच्या कलम ५ अन्वये पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[७] वरील अधिनियमांच्या कलम ६ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमांच्या कलम ६ (२) अन्वये मूळ खंड ऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.

कोणतेही अधिकार देण्यात आले असतील असे सर्व किंवा कोणतेही अधिकार चालवण्यासाठी किंवा त्याजवर लादण्यात आली असतील अशी सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या कोणत्याही अधिका-याचा समावेश होतो ; ]

(ड) कोणत्याही क्षेत्राच्या बाबतींत " प्रतिषिद्ध जातीचा कापूस " याचा अर्थ, अशा क्षेत्रात कलम ३, पोट-कलम (२), खंड (अ), उपखंड (२) अन्वये ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करण्यात आला आहे त्या जातीचा कापूस असा आहे.

(ई) कोणत्याही क्षेत्राच्या बाबतींत " प्रमाण कापूस " याचा अर्थ, अशा क्षेत्रात कलम ३, पोट-कलम (२), खंड (अ), उपखंड (१) अन्वये ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्यास परवानगी देण्यात आली आहे त्या जातीचा कापूस, असा आहे.

कोणत्याही क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करता येईल ती कापसाची जात ठरविणे, वगैरे याबाबत अधिकार.

**३.** (१) (अ) [१][ राज्य ] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या बाबतींत, पुढील गोष्टी करण्याविषयीं आपला इरादा जाहीर करण्याचा अधिकार आहे.—

(एक) अशा क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्याची परवानगी देण्यात येईल ती कापसाची जात ठरविणें;

(दोन) अशा क्षेत्रात कोणत्याही इतर जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करणे,

[२][ (तीन) ] अशा क्षेत्रात कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे किंवा खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीच्या कापसाची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास, प्रतिबंध करणें, आणि

(चार) ज्या कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ झाली आहे असा प्रमाण कापूस किंवा उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीचा कापूस—मग त्याची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो-हे अशा क्षेत्रात जवळ बाळगण्यास, वापरण्यास किंवा त्यांचा व्यापार करण्यास प्रतिषेध करणें किंवा त्यांवर निर्बंध ठेवणे. ]

(ब) अशा क्षेत्रांत ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्याची परवानगी देण्यांत येईल ती कापसाची जात ठरविणे; तसेंच अशी प्रत्येक अधिसूचना अशा क्षेत्रांतील मामलतदाराच्या, [३][ तहसीलदारांच्या ] किंवा महालक-याच्या कचेरींत आणि कलेक्टरच्या मतें ज्या शहरात व गावात राहण्या-या व्यक्तींच्या अशा अधिसूचनेशी संबंध येण्याचा संभव असेल अशा प्रत्येक शहरात व गावात करण्यात आली पाहिजे.

(क) अशा प्रत्येक अधिसूचनेत असे नमूद करण्यांत आले पाहिजे की, अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत—ही मुदत अधिसूचनेच्या दिनांकापासून [४][ दोन महिन्यांपेक्षा ] कमी असता कामा नये— [१][ राज्य ] शासनाकडे जी कोणतीही हरकत किंवा सूचना येईल तिचा [१][ राज्य ] शासनाकडून विचार करण्यात येईल.

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ३ अन्वये मूळ खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.
[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ७ (अ) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (अ) (दोन) अन्वये " तीन महिन्यांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) (अ) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या मुदत संपल्यानंतर आणि अशा मुदतीत आपल्याकडे आलेल्या हरकतींचा व सूचनांचा विचार केल्यानंतर [१][ राज्य ] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्राच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतींत पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :–

(एक) अशा क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्याची परवानगी देण्यांत येईल ती कापसाची जात ठरविणें;

(दोन) अशा क्षेत्रात कोणत्याही इतर जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करणें,

[२][ (तीन) अशा क्षेत्रात कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे किंवा उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीच्या कापसाची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे, आणि

(चार) ज्या कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ झाली आहे असा प्रमाण कापूस किंवा उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीचा कापूस–मग त्याची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो–हे अशा क्षेत्रांत जवळ बाळगण्यास, वापरण्यास किंवा त्यांचा व्यापार करण्यास प्रतिषेध करणे किंवा त्यांवर निर्बंध ठेवणे.]

(ब) तसेच अशी प्रत्येक अधिसूचना अशा क्षेत्रातील, प्रादेशिक भाषेत आणि कलेक्टरास योग्य वाटेल अशा रीतीने अशा क्षेत्रांतील मामलतदाराच्या, [३][ तहसीलदाराच्या ] किंवा महालक-याच्या कचेरीत आणि कलेक्टरच्या मते ज्या शहरात व गांवात राहणा-या व्यक्तीच्या अशा अधिसूचनेशी संबंध येण्याचा संभव असेल अशा प्रत्येक शहरात व गावात प्रसिद्ध करण्यात आली पाहिजे.

प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसा-बरोबर भेसळ करण्यास किंवा कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास कारखान्यांना परवानगी देणे.

[२][ **३-अ** (१) कलम ३ मध्ये किंवा तद्न्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत काहीही अंतर्भूत असले तरी, [१][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, ज्यात कापसापासून सूत किंवा कापड तयार करण्यात येते अशा कोणत्याही कारखान्यांत कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास किंवा कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे :

परंतु,—

(अ) भेसळ केलेल्या कापसाच्या पूर्णपणे दाबलेल्या गाठी करता कामा नयेत, आणि

(ब) असा कापूस अशा कारखान्यांत केवळ सूत किंवा कापड तयार करण्याकरिताच वापरण्यात आला पाहिजे.

(२) कारखान्याच्या मालकाने किंवा कारखाना स्वाधीन असलेल्या व्यक्तीने एक नोंदवही ठेवली पाहिजे किंवा ती ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे व त्या वहीत प्रमाण कापसा व्यतिरिक्त कारखान्यात आलेल्या व वापरलेल्या इतर कापसाची दररोज नोंद करण्यात आली पाहिजे. त्याने अशी नोंदवही, तींत शेवटची नोंद केल्याच्या दिनांकापासून निदान दोन वर्षापर्यंत व्यवस्थित ठेवली पाहिजे.

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ७ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) कारखान्याच्या मालकाने किंवा कारखाना स्वाधीन असलेल्या व्यक्तीने पोट-कलम (२) अन्वये ठेवलेली नोंदवही, कृषिसंचालक [१][ * * * ] यांच्याकडून किंवा त्यांनी याबाबत नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून मागणी करण्यात आली असता, सादर केली पाहिजे. ]

**४.** [२][ (१) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही नियंत्रित क्षेत्रात, जाणूनबुजून व या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा तद्न्वयें काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेचे किंवा केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करून— शास्ती.

(अ) कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची लागवड करील ती, दोषी ठरविण्यात आली असता, पहिल्या अपराधाबद्दल वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि नंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल पन्नास इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल ;

[३][ (ब) तसेच जी कोणतीही व्यक्ती अशा क्षेत्रांत वर सांगितल्याप्रमाणें ,—

(एक) कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करील किंवा करवील किंवा कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची प्रमाण कापसाबरोबर भेसळ करील किंवा करवील, अथवा

(दोन) ज्या कोणत्याही प्रमाण कापसाची इतर कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झाली आहे असा प्रमाण कापूस किंवा कोणत्याही जातीचा कापूस-मग त्याची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो-जवळ बाळगील, वापरील किंवा त्यांचा व्यापार करील, ]

ती, [४][ दोषी ठरविण्यात आली असता, दोन हजार पाचशे रुपयांपर्यंत असू-शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.]

[५][ (२) कारखान्याचा जो कोणताही मालक किंवा कारखाना स्वाधीन असलेली जी कोणतीही व्यक्ती-

(अ) कलम ३-अ, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून, भेसळ केलेल्या कापसाच्या पूर्णपणे दाबलेल्या गाठी आपल्या कारखान्यात तयार करील किंवा भेसळ केलेला कापूस आपल्या कारखान्यात सूत किंवा कापड तयार करण्याच्या कामाव्यतिरिक्त इतर कामी वापरील, अथवा

(ब) कलम ३-अ, पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) याच्या कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात कसूर करील,

ती, [६][ दोषी ठरविण्यात आली असता, दोन हजार पांचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. ]

[७][ (३) ज्या कोणत्याही व्यक्तीस, पोट-कलम (१) खंड (ब) अन्वयेच्या किंवा पोट-कलम (२) अन्वयेच्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल अशी व्यक्ती यथास्थिति, उक्त खंडान्वयेच्या किंवा उक्त पोट-कलमान्वयेच्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी करविण्यात येईल तर, ती पाच हजार रुपयेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र असेल. ]

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ५ अन्वये या कलमाला ४ (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये मूळ पोट-कलमांऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[४] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ९(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ५ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ९(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ९(३) अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

**५.** जेव्हा जेव्हा ह्या अधिनियमाखालील अपराध करण्यात आला असेल तेव्हा तेव्हा, ज्या कापसाच्या संबंधात असा अपराध करण्यात आला असेल तो सर्व कापूस आणि ज्यात असा कापूस असेल ती प्रत्येक पेटी, बारदान, संवेष्टन किंवा आवरण ही जप्त केली जाण्यास पात्र होतील. जप्त करणे.

**६.** (१) जेव्हा कोणत्याही प्रकरणाची फौजदारी न्यायालयाकडून न्यायचौकशी केली जाईल आणि अशा प्रकरणात कलम ५ अन्वये कोणतीही वस्तु जप्त केली जाण्यास पात्र आहे असा न्यायालय निर्णय देईल तेव्हा अशा वस्तूवर हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती असल्यास तिचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, तसेच ती आपल्या हक्काच्या समर्थनार्थ जो कोणताही साक्षीपुरावा सादर करील तो ऐकून घेतल्यावर, न्यायालयास, ती वस्तू जप्त करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार असेल. जप्तीच्या वेळी अनुसरावयाची कार्यरीति.

(२) जेव्हा ह्या अधिनियमाखालील अपराध करण्यात आला असेल आणि अपराधी व्यक्ती माहीत नसेल किंवा सापडत नसेल किंवा ह्या अधिनियमाअन्वये जप्तीस पात्र असलेल्या व कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात नसलेल्या कोणत्याही वस्तुबद्दल समाधानकारक खुलासा मिळत नसेल तेव्हा, [१][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिका-यास त्याबाबत चौकशी करण्याचा व अशी वस्तू जप्त करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार असेल :

परंतु, जप्तीस पात्र असलेली वस्तु पकडल्याच्या दिनांकापासून एक महिन्याची मुदत संपण्यापूर्वी, किंवा अशा वस्तुवर कोणताही हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती असल्यास तिचे म्हणणे ऐकून घेतल्यावाचून, तसेच आपल्या हक्काच्या समर्थनार्थ ती जो कोणताही साक्षीपुरावा सादर करील तो ऐकून घेतल्यावाचून, असा कोणताही आदेश देता येणार नाही.

**७.** (१) कलम ६, पोट-कलम (२) अन्वयें अधिकृत केलेल्या अधिका-यास कलम ४ खालील अपराध केल्याचा जिच्याबद्दल वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्ती कडून अशा अपराधाच्या तडजोडीदाखल कलम १४ अन्वये केलेल्या नियमांनी विहित करण्यात येईल अशी रक्कम स्वीकारण्याचा अधिकार असेल. तडजोड करणे.

(२) अशी रक्कम भरण्यात आल्यानंतर, अशी व्यक्ती अभिरक्षेत असल्यास त्यास सोडून देण्यात आले पाहिजे आणि अशा व्यक्तीविरूध्द अशा अपराधाच्या संबंधात कोणत्याही फौजदारी न्यायालयात कारवाई दाखल करण्यात आली असेल तर, अशा रीतीने केलेल्या तडजोडीमुळे अशी व्यक्ती दोषमुक्त झाली आहे असे समजले पाहिजे ; आणि अशा व्यक्तीविरूध्द अशा अपराधाच्या संबंधात आणखी कोणतीही कारवाई करता कामा नये.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयास किंवा कलम ६, पोट-कलम (२) अन्वये अधिकृत केलेल्या अधिका-यास, कलम ५ अन्वये जप्तीस पात्र असलेली कोणतीही वस्तू जप्त करण्याविषयी आदेश देता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल.

**८.** (१) [१][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास, [२]** प्रवेश करण्याचा व धरण्याचा अधिकार.

(अ) कलम ३ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून, कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची लागवड ज्यांत करण्यात आली आहे किंवा येत आहे असें त्यास माहीत असेल किंवा सकारण वाटत असेल अशा नियंत्रित क्षेत्रांतील कोणत्याही जमिनीवर प्रवेश करण्याचा आणि असा कापूस उपटून काढण्याचा किंवा काढविण्याचा व अशा रीतीने उपटून काढलेला कापूस धरण्याचा अधिकार आहे, अथवा

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १०(१) अन्वये " सकाळचे ६ व संध्याकाळचे ६ वाजल्याच्या दरम्यान " हा मजकूर वगळण्यात आला.

(ब) कलम ३ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून कोणत्याही प्रतिषिध्द जातीचा कापूस-मग त्याची प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो–जीत ठेवण्यात आला आहे असे त्यास माहीत असेल किंवा सकारण वाटत असेल अशी नियंत्रित क्षेत्रातील कोणतीही जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा यावर किंवा त्यात प्रवेश करण्याचा आणि असा कापूस धरण्याचा अधिकार आहे.

[१][ (२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही कापूस धरणा-या प्रत्येक अधिका-याने, ताबडतोब,–

(अ) अशा रीतीने धरण्यात आलेल्या कापसाचा नमुना घेऊन त्याची त्याच वेळी व त्याच जागी, तीन निरनिराळ्या समान भागामध्ये विभागणी केली पाहिजे आणि त्याने, असा प्रत्येक भाग सुरक्षितपणे बांधला पाहिजे आणि ज्यावर किंवा-ज्यांत अशा रीतीने कापूस धरण्यात आला होता अशी जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा जिच्या भोगवट्यात किंवा स्वाधीन असेल अशी व्यक्ती (या कलमांत यानंतर ज्याचा उल्लेख " उपरिनिर्दिष्ट " व्यक्ती असा करण्यात आला आहे) यांच्या समक्ष त्याने आपला शिक्का अशा प्रत्येक भागावर लावून तो सिलबंद केला पाहिजे ; आणि असा भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्ती यांची, अशा प्रत्येक भागावर आपला स्वतःचा शिक्का लावून तो सिलबंद करण्याची इच्छा असेल तर, असा भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्ती यांचे सुध्दा शिक्का लावून असे भाग सिलबंद करण्यात आले पाहिजेत; आणि

(ब) कलम १४ अन्वयें करण्यात आलेल्या नियमांस अधीन राहून, या बाबतीत राज्य शासनाकडून अधिकृत करण्यात येईल अशा अधिका-यांकडे, नमुन्याच्या भागांपैकी एक भाग, विलंब न लावता पाठविला पाहिजे ; व उक्त अधिका-याने, नमुन्याची तपासणी करून आपला अहवाल कृषि संचालकाकडे पाठविला पाहिजे ;

(क) दुसरा भाग, भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्तीच्या स्वाधीन केला पाहिजे व उरलेला भाग स्वतःजवळ ठेवला पाहिजे ;

आणि त्यानंतर—

(ड) धरण्यात आलेल्या कापसापैकी उरलेला कापूस, भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्ती (जर अधिका-याने त्यास तसे करण्यास फर्माविले असेल तर तीने, उक्त कापूस कोणत्याही फौजदारी न्यायालयासमोर सादर करण्यासंबंधात लेखी हमी दिल्यानंतर) यास देण्यात आला पाहिजे ; किंवा तो सुरक्षित रीतीने ताब्यात ठेवण्यासाठी इतर व्यवस्था केली पाहिजे ; आणि

(ई) कापूस जप्त केल्याबद्दल, जप्त केलेल्या कापसाच्या संबंधात केलेल्या अपराधांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असलेल्या सर्वांत जवळच्या पहिल्या वर्गाच्या किंवा दुस-या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास अहवाल पाठविला पाहिजे आणि अशा अहवालात अशा कापसाचा तपशील निर्दिष्ट केला पाहिजे, आणि भोगवटा करणा-या व्यक्तीस किंवा उपरोक्त व्यक्तीस अशा तपशिलाची एक प्रत दिली पाहिजे. ]

(३) पोट-कलम (२) अन्वये अधिकृत केलेल्या अधिका-याचे अशा कापसाविषयीचे मत, जर ते अशा अधिका-याने कोणत्याही दस्तऐवजात नमूद करुन त्यावर आपली सही केली असेल तर, ह्या अधिनियमाअन्वये चालविलेल्या कोणत्याही चौकशीत, इन्साफात किंवा कामात अशा कापसाच्या स्वरुपाविषयी पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १०(२) अन्वये मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

**९.** (१) कोणतीही, जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा हिच्या प्रत्येक मालकाने, किंवा ती ज्याच्या भोगवट्यात किंवा स्वाधीन असेल अशा प्रत्येक व्यक्तीने, कलम ८, पोट-कलम (१) अन्वये अधिकृत केलेल्या अधिका-यास अशी जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा तपासण्यासाठी सर्व वाजवी सवलती दिल्या पाहिजेत. अधिकृत व्यक्तीने तपासणी करण्यासाठी सवलती देण्याबाबत मालकाचे, भोगवटा करणा-याचे व जमीन वगैरे स्वाधीन असणा-या व्यक्तीचे कर्तव्य.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील ती, दोषी ठरविण्यात आली असता, [1][शंभर रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**१०.** या अधिनियमान्वये कोणताही खटला कृषी संचालकांच्या पूर्वमंजुरीशिवाय दाखल करता येणार नाही. खटला दाखल करण्यासाठी पूर्वमंजुरी व मुदत.

**११.** प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधिशाच्या किंवा दुस-या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयाहून कमी दर्जाच्या कोणत्याही फौजदारी न्यायालयास या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता येणार नाही. अपराधांची दखल घेणे.

१८९८ चा ५. [2][**११अ.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८,* कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधिशाने किंवा पहिल्या वर्गाच्या कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाने, उक्त संहितेचे कलम ३२ अन्वये त्यास, शिक्षा देण्याबाबत जे अधिकार देण्यात आले आहेत त्याबाहेर जाऊन कलम ४ अन्वये ती शिक्षा देण्याचा अधिकार असेल अशी कोणतीही शिक्षा देणे हे विधिसंमत असेल.] वाढविलेल्या शास्ती देण्याचा फौजदारी न्यायाधीशाचा अधिकार.

**१२.** या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा हेतू आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करता येणार नाही. या अधिनियमाअन्वये केलेल्या कृत्यांचे संरक्षण.

१८६० चा ४५. **१३.** या अधिनियमाच्या तरतुदीनुसार काम करणारा किंवा काम करण्याचा ज्याचा आशय आहे असा प्रत्येक अधिकारी हा भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे, असे समजण्यात येईल. या अधिनियमा अन्वयें काम करणारा अधिकारी लोकसेवक असणे.

**१४.** (१) [3][राज्य] शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे नियम करण्याचा अधिकार असेल. नियम.

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ११ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये कलम ११ अ समाविष्ट करण्यात आले.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)

[3] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) विशेषकरून व वरील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, [1][राज्य] शासनास पुढील सर्व किंवा कोणत्याही कारणांकरिता नियम करण्याचा अधिकार असेल :—

(अ) कलम ७ अन्वये तडजोडीदाखल द्यावयाची रक्कम विहित करणे ;

(ब) कलम ८ अन्वये धरण्यात आलेला कापूस ज्या शर्तीस अनुसरून पाठविता येईल त्या शर्ती विहीत करणे.

[2][(क) या अधिनियमान्वये जप्त केलेल्या सर्व वस्तूंची विल्हेवाट लावण्याबाबत नियमन करणे.]

(३) अशा कोणत्याही नियमांत अशी तरतूद करता येईल की, नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याबद्दल [3][दोनशे पन्नास रुपये] पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) या कलमान्वये केलेले नियम, ते कायम करण्यापूर्वी राजपत्रात आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील.

[4][(५) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आले पाहिजेत आणि अशा रीतीने ते ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगत पुढील अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यांत जे फेरफार करील व राजपत्रात प्रसिद्ध करील त्या फेरफारांच्या अधीन असतील.]

रद्द करणे.

**१५.** मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९३५ हा याअन्वये रद्द करण्यात आला आहे **:** १९३५ चा मुंबई ३५.

परंतु, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९३५, कलम ३ अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना या अधिनियमाचे कलम ३, पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे रद्द करण्यात आली नसेल तर व रद्द करण्यात येईपर्यंत, उक्त पोट-कलमाअन्वये काढण्यात आली आहे असे समजले पाहिजे **:**

तसेच, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९३५ या खालील कोणत्याही अपराधाच्या संबंधात चालविलेले व हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकास अनिर्णित असलेले कोणतेही काम, जणू हा अधिनियम संमत करण्यात आला नव्हता असे समजून, चालू ठेवले पाहिजे व त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. १९३५ चा मुंबई ३५.

सन १९५४ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक १७ हा रद्द करणें आणि बचाव.

[5]**[ १६.** (१) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला मध्यप्रदेश कापूस नियंत्रण अधिनियम, १९५४ हा, मुंबई कापूस नियंत्रण (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६२ अंमलात आल्यावर रद्द करण्यात येईल. १९५४ चा मध्यप्रदेश ७.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे,— सन १९६२ चा महा. ४७.

(अ) अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमाचा पूर्वीचा अंमल किंवा तद्न्वये केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट ;

(ब) अशारीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमा अन्वये संपादन केलेला किंवा प्राप्त केलेला कोणताही हक्क, विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी ;

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ती, केलेली जप्ती, किंवा शिक्षा, किंवा जबाबदारी ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश,१९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १३ (१) अन्वये हा खंड ( ) समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १३ (२) अन्वये " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १३ (३) अन्वये पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १४ द्वारे कलम १६ समाविष्ट करण्यात आले.

(ड) उपरोक्त कोणताही असा हक्क, विशेषाधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यांच्या संबंधांतील कोणती चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना, यास बाध येणार नाही,

सन १८६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७.

आणि, जणू मुंबई कापूस नियंत्रण (व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६२ हा संमत झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ति, जप्ती व शिक्षा करता येईल :

परंतु, अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही उपाययोजना ही, (यात काढलेली कोणतीही अधिसूचना, दिलेली परवानगी, केलेले अधिकारपत्र, दिलेली मंजुरी आणि तयार केलेले नियम यांचा समावेश होतो) जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीअन्वये केलेली गोष्ट किंवा उपाययोजना आहे असे समजले पाहिजे आणि ती, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या उपाययोजनेद्वारें रद्द करण्यात आली नसेल तर आणि रद्द करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.]

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  **शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन**
  **(प्रकाशन शाखा),**
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : २३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  **शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार**
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : २६१२ ४७ ५९, २६१२ ५८ ०८
  २६१२ ८९ २०

- **व्यवस्थापक**
  **शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार**
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : २५ ६२ ६१५

- **पर्यवेक्षक**
  **शासकीय ग्रंथागार**
  पैठण रोड, रेल्वे स्टेशन जवळ,
  औरंगाबाद ४३१ ००५
  दूरध्वनी : २३ ३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  **शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री, ग्रंथागार**
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : २६ ५० ३९५ व २६ ५० ४०२

**व महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

**सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०**

# मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२

**( दिनांक १९ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित )**

***BOMBAY ACT NO. XXX OF 1942***

# The Bombay Cotton Control Act, 1942

*( As modified upto the 19th September, 2011 )*

✷

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१३

[ किंमत : रु. ५.०० ]

# मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

**कलमे**


१. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

२. व्याख्या.

३. कोणत्याही क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करता येईल ती कापसाची जात ठरविणे, वगैरे याबाबत अधिकार.

३ अ. प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास किंवा कोणत्याही प्रतिषिद्ध जातीच्या कापसाची प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास कारखान्यांना परवानगी देणे.

४. शास्ती.

५. जप्त करणे.

६. जप्तीच्या वेळी अनुसरावयाची कार्यरीति

७. तडजोड करणे.

८. प्रवेश करण्याचा व धरण्याचा अधिकार.

९. अधिकृत व्यक्तीने तपासणी करण्यासाठी सवलती देण्याबाबत मालकाचे, भोगवटा करणा-याचे व जमीन वगैरे स्वाधीन असणा-या व्यक्तीचे कर्तव्य.

१०. खटला दाखल करण्यासाठी पूर्वमंजुरी व मुदत.

११. अपराधांची दखल घेणे.

११ अ. वाढविलेल्या शास्ती देण्याचा फौजदारी न्यायाधीशांचा अधिकार.

१२. या अधिनियमान्वये केलेल्या कृत्यांचे संरक्षण.

१३. या अधिनियमान्वये काम करणारा अधिकारी लोकसेवक असणे.

१४. नियम.

१५. रद्द करणे.

१६. सन १९५४ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक १७ हा रद्द करणे आणि बचाव.

## *[ सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३० ][1]

# [ मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२ ]†

**[ २ मार्च, १९४३. ]**

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९४७ चा मुंबई अधिनियम ६३.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७.

**[2][महाराष्ट्र राज्याच्या] कोणत्याही भागात कोणत्याही जातीच्या कापसाची लागवड करणे, प्रतिषिद्ध जातीच्या कापसाची इतर जातीच्या कापसाबरोबर भेसळ करणे आणि प्रतिषिद्ध जातीचा कापूस जवळ बाळगणे, वापरणे किंवा त्याचा व्यापार करणे, या गोष्टींचे नियमन करण्यासाठी व त्यास प्रतिषेध करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [3][महाराष्ट्र राज्यातील] काही क्षेत्रात, कापसाची लागवड करण्या-यांच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीने तसेच कापसाचा व्यापार व [4][उक्त राज्याची ]आर्थिक समृद्धी यांच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीने त्या क्षेत्रांत लागवड केलेल्या कापसाची प्रत व लौकिक कायम राखणे आणि त्या कारणासाठी अशा क्षेत्रात लागवड करावयाच्या कापसाची जात ठरविणे, इतर कोणत्याही जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करणे, प्रतिषिद्ध जातीच्या कापसाची इतर कोणत्याही कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे आणि प्रतिषिद्ध जातीचा कापूस जवळ बाळगणे, वापरणे किंवा त्याचा व्यापार करणे या गोष्टीस प्रतिषेध करणे किंवा त्यांवर निर्बंध ठेवणे इष्ट आहे ;

[5][ **त्याअर्थी** ; याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— ]

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

[6][ (२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल. ]

**२.** विषयांत किंवा संदर्भात एतद्‌विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात— व्याख्या.

(अ) " नियंत्रित क्षेत्र " याचा अर्थ, कलम ३ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेले क्षेत्र, असा आहे.

(ब) " कापूस " या संज्ञेत, कापसाचे रोप, [7][सरकी काढलेला कापूस, टरफलयुक्त कापूस (कपास)] गाळ कापूस (वेस्ट कॉटन ) व सरकी यांचा समावेश होतो ;

[(क) " कृषि संचालक " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्याचा कृषि संचालक म्हणून राज्य सरकारने त्या त्यावेळी नेमलेला अधिकारी असा आहे व तीत, या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार कृषि संचालकास जे

---

* सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २ अन्वये हा अधिनियम नव्याने अधिनियमित करण्यात आला.

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९४३, भाग ४, पृ. ७२ आणि ७३ पहा.

† हा अधिनियम राज्याच्या उर्वरित भागात लागू करण्यात आला (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम २ पहा.)

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ अन्वये " मुंबई प्रांताच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४ (१) (अ) अन्वये " मुंबई प्रांतातील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात यावा.

[4] वरील अधिनियमांच्या कलम ४ (१) (ब) अन्वये " उक्त प्रांताची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमांच्या कलम ४ (२) अन्वये परिच्छेद दोन आणि तीन ऐवजी हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमांच्या कलम ५ अन्वये पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[7] वरील अधिनियमांच्या कलम ६ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] वरील अधिनियमांच्या कलम ६ (२) अन्वये मूळ खंड ऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.

कोणतेही अधिकार देण्यात आले असतील असे सर्व किंवा कोणतेही अधिकार चालवण्यासाठी किंवा त्याजवर लादण्यात आली असतील अशी सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या कोणत्याही अधिका-याचा समावेश होतो ;]

(ड) कोणत्याही क्षेत्राच्या बाबतींत " प्रतिषिद्ध जातीचा कापूस " याचा अर्थ, अशा क्षेत्रात कलम ३, पोट-कलम (२), खंड (अ), उपखंड (२) अन्वये ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करण्यात आला आहे त्या जातीचा कापूस असा आहे.

(ई) कोणत्याही क्षेत्राच्या बाबतींत " प्रमाण कापूस " याचा अर्थ, अशा क्षेत्रात कलम ३, पोट-कलम (२), खंड (अ), उपखंड (१) अन्वये ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्यास परवानगी देण्यात आली आहे त्या जातीचा कापूस, असा आहे.

कोणत्याही क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करता येईल ती कापसाची जात ठरविणे, वगैरे याबाबत अधिकार.

**३.** (१) (अ) [१][ राज्य ] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या बाबतींत, पुढील गोष्टी करण्याविषयीं आपला इरादा जाहीर करण्याचा अधिकार आहे.—

(एक) अशा क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्याची परवानगी देण्यात येईल ती कापसाची जात ठरविणें;

(दोन) अशा क्षेत्रात कोणत्याही इतर जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करणे,

[२][ (तीन) ] अशा क्षेत्रात कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे किंवा खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीच्या कापसाची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास, प्रतिबंध करणें, आणि

(चार) ज्या कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ झाली आहे असा प्रमाण कापूस किंवा उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीचा कापूस—मग त्याची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो-हे अशा क्षेत्रात जवळ बाळगण्यास, वापरण्यास किंवा त्यांचा व्यापार करण्यास प्रतिषेध करणें किंवा त्यांवर निर्बंध ठेवणे. ]

(ब) अशा क्षेत्रांत ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्याची परवानगी देण्यांत येईल ती कापसाची जात ठरविणे; तसेंच अशी प्रत्येक अधिसूचना अशा क्षेत्रांतील मामलतदाराच्या, [३][ तहसीलदारांच्या ] किंवा महालक-याच्या कचेरींत आणि कलेक्टरच्या मतें ज्या शहरात व गावात राहण्या-या व्यक्तीच्या अशा अधिसूचनेशी संबंध येण्याचा संभव असेल अशा प्रत्येक शहरात व गावात करण्यात आली पाहिजे.

(क) अशा प्रत्येक अधिसूचनेत असे नमूद करण्यांत आले पाहिजे की, अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत—ही मुदत अधिसूचनेच्या दिनांकापासून [४][ दोन महिन्यांपेक्षा ] कमी असता कामा नये— [१][ राज्य ] शासनाकडे जी कोणतीही हरकत किंवा सूचना येईल तिचा [१][ राज्य ] शासनाकडून विचार करण्यात येईल.

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ३ अन्वये मूळ खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ७ (अ) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (अ) (दोन) अन्वये " तीन महिन्यांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) (अ) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या मुदत संपल्यानंतर आणि अशा मुदतीत आपल्याकडे आलेल्या हरकतींचा व सूचनांचा विचार केल्यानंतर [1][ राज्य ] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्राच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतींत पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :–

(एक) अशा क्षेत्रात ज्या जातीच्या कापसाची लागवड करण्याची परवानगी देण्यांत येईल ती कापसाची जात ठरविणें;

(दोन) अशा क्षेत्रात कोणत्याही इतर जातीच्या कापसाची लागवड करण्यास प्रतिषेध करणें,

[2][ (तीन) अशा क्षेत्रात कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे किंवा उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीच्या कापसाची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास प्रतिषेध करणे, आणि

(चार) ज्या कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ झाली आहे असा प्रमाण कापूस किंवा उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जातीचा कापूस–मग त्याची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो–हे अशा क्षेत्रांत जवळ बाळगण्यास, वापरण्यास किंवा त्यांचा व्यापार करण्यास प्रतिषेध करणे किंवा त्यांवर निर्बंध ठेवणे.]

(ब) तसेच अशी प्रत्येक अधिसूचना अशा क्षेत्रातील, प्रादेशिक भाषेत आणि कलेक्टरास योग्य वाटेल अशा रीतीने अशा क्षेत्रांतील मामलतदाराच्या, [3][ तहसीलदाराच्या ] किंवा महालक-याच्या कचेरीत आणि कलेक्टरच्या मते ज्या शहरात व गांवात राहणा-या व्यक्तीच्या अशा अधिसूचनेशी संबंध येण्याचा संभव असेल अशा प्रत्येक शहरात व गावात प्रसिद्ध करण्यात आली पाहिजे.

प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसा-बरोबर भेसळ करण्यास किंवा कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास कारखान्यांना परवानगी देणे.

[2][ **३-अ** (१) कलम ३ मध्ये किंवा तद्न्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत काहीही अंतर्भूत असले तरी, [1][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, ज्यात कापसापासून सूत किंवा कापड तयार करण्यात येते अशा कोणत्याही कारखान्यांत कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास किंवा कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे :

परंतु,—

(अ) भेसळ केलेल्या कापसाच्या पूर्णपणे दाबलेल्या गाठी करता कामा नयेत, आणि

(ब) असा कापूस अशा कारखान्यांत केवळ सूत किंवा कापड तयार करण्याकरिताच वापरण्यात आला पाहिजे.

(२) कारखान्याच्या मालकाने किंवा कारखाना स्वाधीन असलेल्या व्यक्तीने एक नोंदवही ठेवली पाहिजे किंवा ती ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे व त्या वहीत प्रमाण कापसा व्यतिरिक्त कारखान्यात आलेल्या व वापरलेल्या इतर कापसाची दररोज नोंद करण्यात आली पाहिजे. त्याने अशी नोंदवही, तींत शेवटची नोंद केल्याच्या दिनांकापासून निदान दोन वर्षापर्यंत व्यवस्थित ठेवली पाहिजे.

---

[1] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ७ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) कारखान्याच्या मालकाने किंवा कारखाना स्वाधीन असलेल्या व्यक्तीने पोट-कलम (२) अन्वये ठेवलेली नोंदवही, कृषिसंचालक [1][ * * * ] यांच्याकडून किंवा त्यांनी याबाबत नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून मागणी करण्यात आली असता, सादर केली पाहिजे. ]

**४.** [2][ (१) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही नियंत्रित क्षेत्रात, जाणूनबुजून व या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा तद्न्वयें काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेचे किंवा केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करुन– शास्ती.

(अ) कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची लागवड करील ती, दोषी ठरविण्यात आली असता, पहिल्या अपराधाबद्दल वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि नंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल पन्नास इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल ;

[3][ (ब) तसेच जी कोणतीही व्यक्ती अशा क्षेत्रांत वर सांगितल्याप्रमाणें ,—

(एक) कोणत्याही प्रमाण कापसाची कोणत्याही इतर प्रमाण कापसाबरोबर भेसळ करील किंवा करवील किंवा कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची प्रमाण कापसाबरोबर भेसळ करील किंवा करवील, अथवा

(दोन) ज्या कोणत्याही प्रमाण कापसाची इतर कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झाली आहे असा प्रमाण कापूस किंवा कोणत्याही जातीचा कापूस-मग त्याची कोणत्याही प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो-जवळ बाळगील, वापरील किंवा त्यांचा व्यापार करील, ]

ती, [4][ दोषी ठरविण्यात आली असता, दोन हजार पाचशे रुपयांपर्यंत असू-शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.]

[5][ (२) कारखान्याचा जो कोणताही मालक किंवा कारखाना स्वाधीन असलेली जी कोणतीही व्यक्ती-

(अ) कलम ३-अ, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून, भेसळ केलेल्या कापसाच्या पूर्णपणे दाबलेल्या गाठी आपल्या कारखान्यात तयार करील किंवा भेसळ केलेला कापूस आपल्या कारखान्यात सूत किंवा कापड तयार करण्याच्या कामाव्यतिरिक्त इतर कामी वापरील, अथवा

(ब) कलम ३-अ, पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) याच्या कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात कसूर करील,

ती, [6][ दोषी ठरविण्यात आली असता, दोन हजार पांचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. ]

[7][ (३) ज्या कोणत्याही व्यक्तीस, पोट-कलम (१) खंड (ब) अन्वयेच्या किंवा पोट-कलम (२) अन्वयेच्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल अशी व्यक्ती यथास्थिति, उक्त खंडान्वयेच्या किंवा उक्त पोट-कलमान्वयेच्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी करविण्यात येईल तर, ती पाच हजार रुपयेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र असेल. ]

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ५ अन्वये या कलमाला ४ (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये मूळ पोट-कलमांऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[4] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ९(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ५ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[6] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ९(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ९(३) अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

**५.** जेव्हा जेव्हा ह्या अधिनियमाखालील अपराध करण्यात आला असेल तेव्हा तेव्हा, ज्या कापसाच्या संबंधात असा अपराध करण्यात आला असेल तो सर्व कापूस आणि ज्यात असा कापूस असेल ती प्रत्येक पेटी, बारदान, संवेष्टन किंवा आवरण ही जप्त केली जाण्यास पात्र होतील. जप्त करणे.

**६.** (१) जेव्हा कोणत्याही प्रकरणाची फौजदारी न्यायालयाकडून न्यायचौकशी केली जाईल आणि अशा प्रकरणात कलम ५ अन्वये कोणतीही वस्तु जप्त केली जाण्यास पात्र आहे असा न्यायालय निर्णय देईल तेव्हा अशा वस्तूवर हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती असल्यास तिचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, तसेच ती आपल्या हक्काच्या समर्थनार्थ जो कोणताही साक्षीपुरावा सादर करील तो ऐकून घेतल्यावर, न्यायालयास, ती वस्तू जप्त करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार असेल. जप्तीच्या वेळी अनुसरावयाची कार्यरीति.

(२) जेव्हा ह्या अधिनियमाखालील अपराध करण्यात आला असेल आणि अपराधी व्यक्ती माहीत नसेल किंवा सापडत नसेल किंवा ह्या अधिनियमाअन्वये जप्तीस पात्र असलेल्या व कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात नसलेल्या कोणत्याही वस्तुबद्दल समाधानकारक खुलासा मिळत नसेल तेव्हा, [१][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिका-यास त्याबाबत चौकशी करण्याचा व अशी वस्तू जप्त करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार असेल :

परंतु, जप्तीस पात्र असलेली वस्तु पकडल्याच्या दिनांकापासून एक महिन्याची मुदत संपण्यापूर्वी, किंवा अशा वस्तुवर कोणताही हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती असल्यास तिचे म्हणणे ऐकून घेतल्यावाचून, तसेच आपल्या हक्काच्या समर्थनार्थ ती जो कोणताही साक्षीपुरावा सादर करील तो ऐकून घेतल्यावाचून, असा कोणताही आदेश देता येणार नाही.

**७.** (१) कलम ६, पोट-कलम (२) अन्वयें अधिकृत केलेल्या अधिका-यास कलम ४ खालील अपराध केल्याचा जिच्याबद्दल वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्ती कडून अशा अपराधाच्या तडजोडीदाखल कलम १४ अन्वये केलेल्या नियमांनी विहित करण्यात येईल अशी रक्कम स्वीकारण्याचा अधिकार असेल. तडजोड करणे.

(२) अशी रक्कम भरण्यात आल्यानंतर, अशी व्यक्ती अभिरक्षेत असल्यास त्यास सोडून देण्यात आले पाहिजे आणि अशा व्यक्तीविरूध्द अशा अपराधाच्या संबंधात कोणत्याही फौजदारी न्यायालयात कारवाई दाखल करण्यात आली असेल तर, अशा रीतीने केलेल्या तडजोडीमुळे अशी व्यक्ती दोषमुक्त झाली आहे असे समजले पाहिजे ; आणि अशा व्यक्तीविरूध्द अशा अपराधाच्या संबंधात आणखी कोणतीही कारवाई करता कामा नये.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयास किंवा कलम ६, पोट-कलम (२) अन्वये अधिकृत केलेल्या अधिका-यास, कलम ५ अन्वये जप्तीस पात्र असलेली कोणतीही वस्तू जप्त करण्याविषयी आदेश देता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल.

**८.** (१) [१][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास, [२]** प्रवेश करण्याचा व धरण्याचा अधिकार.

(अ) कलम ३ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून, कोणत्याही प्रतिषिध्द जातीच्या कापसाची लागवड ज्यांत करण्यात आली आहे किंवा येत आहे असें त्यास माहीत असेल किंवा सकारण वाटत असेल अशा नियंत्रित क्षेत्रांतील कोणत्याही जमिनीवर प्रवेश करण्याचा आणि असा कापूस उपटून काढण्याचा किंवा काढविण्याचा व अशा रीतीने उपटून काढलेला कापूस धरण्याचा अधिकार आहे, अथवा

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १०(१) अन्वये " सकाळचे ६ व संध्याकाळचे ६ वाजल्याच्या दरम्यान " हा मजकूर वगळण्यात आला.

(ब) कलम ३ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून कोणत्याही प्रतिषिध्द जातीचा कापूस-मग त्याची प्रमाण कापसाबरोबर भेसळ झालेली असो वा नसो–जीत ठेवण्यात आला आहे असे त्यास माहीत असेल किंवा सकारण वाटत असेल अशी नियंत्रित क्षेत्रातील कोणतीही जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा यावर किंवा त्यात प्रवेश करण्याचा आणि असा कापूस धरण्याचा अधिकार आहे.

[१][ (२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही कापूस धरणा-या प्रत्येक अधिका-याने, ताबडतोब,–

(अ) अशा रीतीने धरण्यात आलेल्या कापसाचा नमुना घेऊन त्याची त्याच वेळी व त्याच जागी, तीन निरनिराळ्या समान भागामध्ये विभागणी केली पाहिजे आणि त्याने, असा प्रत्येक भाग सुरक्षितपणे बांधला पाहिजे आणि ज्यावर किंवा-ज्यांत अशा रीतीने कापूस धरण्यात आला होता अशी जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा जिच्या भोगवट्यात किंवा स्वाधीन असेल अशी व्यक्ती (या कलमांत यानंतर ज्याचा उल्लेख " उपरिनिर्दिष्ट " व्यक्ती असा करण्यात आला आहे) यांच्या समक्ष त्याने आपला शिक्का अशा प्रत्येक भागावर लावून तो सिलबंद केला पाहिजे ; आणि असा भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्ती यांची, अशा प्रत्येक भागावर आपला स्वतःचा शिक्का लावून तो सिलबंद करण्याची इच्छा असेल तर, असा भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्ती यांचे सुध्दा शिक्का लावून असे भाग सिलबंद करण्यात आले पाहिजेत; आणि

(ब) कलम १४ अन्वयें करण्यात आलेल्या नियमांस अधीन राहून, या बाबतीत राज्य शासनाकडून अधिकृत करण्यात येईल अशा अधिका-यांकडे, नमुन्याच्या भागांपैकी एक भाग, विलंब न लावता पाठविला पाहिजे ; व उक्त अधिका-याने, नमुन्याची तपासणी करून आपला अहवाल कृषि संचालकाकडे पाठविला पाहिजे ;

(क) दुसरा भाग, भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्तीच्या स्वाधीन केला पाहिजे व उरलेला भाग स्वतःजवळ ठेवला पाहिजे ;

आणि त्यानंतर—

(ड) धरण्यात आलेल्या कापसापैकी उरलेला कापूस, भोगवटा करणारी व्यक्ती किंवा उपरिनिर्दिष्ट व्यक्ती (जर अधिका-याने त्यास तसे करण्यास फर्माविले असेल तर तीने, उक्त कापूस कोणत्याही फौजदारी न्यायालयासमोर सादर करण्यासंबंधात लेखी हमी दिल्यानंतर) यास देण्यात आला पाहिजे ; किंवा तो सुरक्षित रीतीने ताब्यात ठेवण्यासाठी इतर व्यवस्था केली पाहिजे ; आणि

(ई) कापूस जप्त केल्याबद्दल, जप्त केलेल्या कापसाच्या संबंधात केलेल्या अपराधांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असलेल्या सर्वांत जवळच्या पहिल्या वर्गाच्या किंवा दुस-या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास अहवाल पाठविला पाहिजे आणि अशा अहवालात अशा कापसाचा तपशील निर्दिष्ट केला पाहिजे, आणि भोगवटा करणा-या व्यक्तीस किंवा उपरोक्त व्यक्तीस अशा तपशिलाची एक प्रत दिली पाहिजे. ]

(३) पोट-कलम (२) अन्वये अधिकृत केलेल्या अधिका-याचे अशा कापसाविषयीचे मत, जर ते अशा अधिका-याने कोणत्याही दस्तऐवजात नमूद करुन त्यावर आपली सही केली असेल तर, ह्या अधिनियमाअन्वये चालविलेल्या कोणत्याही चौकशीत, इन्साफात किंवा कामात अशा कापसाच्या स्वरुपाविषयी पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १०(२) अन्वये मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

**९.** (१) कोणतीही, जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा हिच्या प्रत्येक मालकाने, किंवा ती ज्याच्या भोगवट्यात किंवा स्वाधीन असेल अशा प्रत्येक व्यक्तीने, कलम ८, पोट-कलम (१) अन्वये अधिकृत केलेल्या अधिका-यास अशी जमीन, इमारत, जहाज, जलयान, वाहन किंवा जागा तपासण्यासाठी सर्व वाजवी सवलती दिल्या पाहिजेत.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील ती, दोषी ठरविण्यात आली असता, [१][शंभर रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

अधिकृत व्यक्तीने तपासणी करण्यासाठी सवलती देण्याबाबत मालकाचे, भोगवटा करणा-याचे व जमीन वगैरे स्वाधीन असणा-या व्यक्तीचे कर्तव्य.

**१०.** या अधिनियमान्वये कोणताही खटला कृषी संचालकांच्या पूर्वमंजुरीशिवाय दाखल करता येणार नाही.

खटला दाखल करण्यासाठी पूर्वमंजुरी व मुदत.

**११.** प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधिशाच्या किंवा दुस-या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयाहून कमी दर्जाच्या कोणत्याही फौजदारी न्यायालयास या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता येणार नाही.

अपराधांची दखल घेणे.

१८९८ चा ५. [२][**११अ.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८,* कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधिशाने किंवा पहिल्या वर्गाच्या कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाने, उक्त संहितेचे कलम ३२ अन्वये त्यास, शिक्षा देण्याबाबत जे अधिकार देण्यात आले आहेत त्याबाहेर जाऊन कलम ४ अन्वये ती शिक्षा देण्याचा अधिकार असेल अशी कोणतीही शिक्षा देणे हे विधिसंमत असेल.]

वाढविलेल्या शास्ती देण्याचा फौजदारी न्यायाधीशाचा अधिकार.

**१२.** या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा हेतू आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करता येणार नाही.

या अधिनियमाअन्वये केलेल्या कृत्यांचे संरक्षण.

१८६० चा ४५. **१३.** या अधिनियमाच्या तरतुदीनुसार काम करणारा किंवा काम करण्याचा ज्याचा आशय आहे असा प्रत्येक अधिकारी हा भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे, असे समजण्यात येईल.

या अधिनियमा अन्वयें काम करणारा अधिकारी लोकसेवक असणे.

**१४.** (१) [३][राज्य] शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे नियम करण्याचा अधिकार असेल.

नियम.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ११ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये कलम ११ अ समाविष्ट करण्यात आले.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) विशेषकरून व वरील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, [1][राज्य] शासनास पुढील सर्व किंवा कोणत्याही कारणांकरिता नियम करण्याचा अधिकार असेल :—

(अ) कलम ७ अन्वये तडजोडीदाखल द्यावयाची रक्कम विहित करणे ;

(ब) कलम ८ अन्वये धरण्यात आलेला कापूस ज्या शर्तीस अनुसरून पाठविता येईल त्या शर्ती विहीत करणे.

[2][(क) या अधिनियमान्वये जप्त केलेल्या सर्व वस्तूंची विल्हेवाट लावण्याबाबत नियमन करणे.]

(३) अशा कोणत्याही नियमांत अशी तरतूद करता येईल की, नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याबद्दल [3][दोनशे पन्नास रुपये] पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) या कलमान्वये केलेले नियम, ते कायम करण्यापूर्वी राजपत्रात आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील.

[4][(५) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आले पाहिजेत आणि अशा रीतीने ते ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगत पुढील अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यांत जे फेरफार करील व राजपत्रात प्रसिद्ध करील त्या फेरफारांच्या अधीन असतील.]

रद्द करणे.

**१५.** मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९३५ हा याअन्वये रद्द करण्यात आला आहे **:** १९३५ चा मुंबई ३५.

परंतु, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९३५, कलम ३ अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना या अधिनियमाचे कलम ३, पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे रद्द करण्यात आली नसेल तर व रद्द करण्यात येईपर्यंत, उक्त पोट-कलमाअन्वये काढण्यात आली आहे असे समजले पाहिजे **:**

तसेच, मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९३५ या खालील कोणत्याही अपराधाच्या संबंधात चालविलेले व हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकास अनिर्णित असलेले कोणतेही काम, जणू हा अधिनियम संमत करण्यात आला नव्हता असे समजून, चालू ठेवले पाहिजे व त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. १९३५ चा मुंबई ३५.

सन १९५४ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक १७ हा रद्द करणें आणि बचाव.

[5]**[ १६.** (१) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला मध्यप्रदेश कापूस नियंत्रण अधिनियम, १९५४ हा, मुंबई कापूस नियंत्रण (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६२ अंमलात आल्यावर रद्द करण्यात येईल. १९५४ चा मध्यप्रदेश ७.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे,— सन १९६२ चा महा. ४७.

(अ) अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमाचा पूर्वीचा अंमल किंवा तद्न्वये केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट ;

(ब) अशारीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमा अन्वये संपादन केलेला किंवा प्राप्त केलेला कोणताही हक्क, विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी ;

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ती, केलेली जप्ती, किंवा शिक्षा, किंवा जबाबदारी ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश,१९५० अन्वये “ प्रांतिक ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १३ (१) अन्वये हा खंड ( ) समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १३ (२) अन्वये “ पन्नास रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १३ (३) अन्वये पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १४ द्वारे कलम १६ समाविष्ट करण्यात आले.

(ड) उपरोक्त कोणताही असा हक्क, विशेषाधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यांच्या संबंधांतील कोणती चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना, यास बाध येणार नाही,

सन १८६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७.

आणि, जणू मुंबई कापूस नियंत्रण (व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६२ हा संमत झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ति, जप्ती व शिक्षा करता येईल :

परंतु, अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही उपाययोजना ही, (यात काढलेली कोणतीही अधिसूचना, दिलेली परवानगी, केलेले अधिकारपत्र, दिलेली मंजुरी आणि तयार केलेले नियम यांचा समावेश होतो) जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीअन्वये केलेली गोष्ट किंवा उपाययोजना आहे असे समजले पाहिजे आणि ती, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या उपाययोजनेद्वारें रद्द करण्यात आली नसेल तर आणि रद्द करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.]

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  **शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन**
  **(प्रकाशन शाखा),**
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : २३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  **शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार**
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : २६१२ ४७ ५९, २६१२ ५८ ०८
  २६१२ ८९ २०

- **व्यवस्थापक**
  **शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार**
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : २५ ६२ ६१५

- **पर्यवेक्षक**
  **शासकीय ग्रंथागार**
  पैठण रोड, रेल्वे स्टेशन जवळ,
  औरंगाबाद ४३१ ००५
  दूरध्वनी : २३ ३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  **शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री, ग्रंथागार**
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : २६ ५० ३९५ व २६ ५० ४०२

**व महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**